प्रेस नोट

पो.स्टे.कारंजा शहर
दि.०१/०३/२०२२

आज दिनांक ०१/०३/२०२२ रोजी फिर्यादी नामे निलेश रामदास ताथोड वय ४१ वर्षे अन्न सुरक्षा अधिकारी अकोला यांनी पो.स्टे.ला. तक्रार दिली की,तरूण भारत नागपुर या वर्तमानपत्रात दि.२८.०२.२०२२ रोजी सात बालकांना पेप्सीतुन विषबाधा या प्रकाचे बातमीच्या अनुषंगाने आज रोजी वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गर्शनात तपासणी कामी कारंजा लाड शहरातील राम मंदीर परीसरात पाहणी व तपास चौकशी केली असता सदर ठिकाणी विषबाधीत बालकांची चौकशी केली व जबाब घेतले असता सदर घटना ही दि. १९.०२.२०२ रोजी घडली असुन सदर बालकांनी मॅगो फ्लेवर पेप्सी विकत घेवुन त्याचे सेवक केले त्यातुन त्यांना मळमळ,उलटी तसेच संडासचा त्रास झाले असल्याचे सांगीतले तसेच आज रोजी ते प्रकृती बरी असल्याचे आढळुन आले बालकांची चौकशी केली असता त्यांनी दि.१९.०२.२०२२ रोजी में कल्याणी किराणा पत्ता मोटे राम मंदीरा जवळ कारंजा लाड येथुन खरेदी केल्याचे आढळले नमुद प्रकरणी में कल्याणी पत्ता मोठे राम मंदीरा जवळ कारंजा लाड येथील हजर ईसम यास त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्याचे नाव श्री,राजेन्द्र रामराव महुरकर वय ६१ वर्षे रा. मोठे राम मंदीरा जवळ कारंजा लाड असे सागींतले नमुद हजर व्यक्ती याचे पेढीची लेखी तपासणी केली असता सदर नमुद हजर व्यक्ती तथा व्यवसायाकांने कथीत अन्न विषबाधीत अन्न पदार्थ हे फिरत्याविक्रेत्या कडुन खरेदी केल्याचे तोंडी सागींतले तसेच फिरत्याविक्रेत्या नाव गांव तसेच संपर्क नसल्याचे सागींतले तसेच खरेदी बिल त्यांचे कडे नसल्याचे सागींतले सदर पेढी कडे आज रोजी कथीत पेप्सी या अन्न पदार्थाचा साठा आढळला नाही सदर प्रकरणी मे कल्याणी किराणा, पत्ता मोठे राम मंदीरा जवळ कारंजा लाड जि.वाशिम चे जबाबदार व्यक्ती श्री, राजेन्द्र रामराव महुरकर वय ६१ वर्षे रा. मोठे राम मंदीरा जवळ कारंजा लाड यांना विचारणा केली असता त्यांनी सदर कथीत पेप्सी या अन्न पदार्था बाबत कोणतेही योग्य माहीती दिली नाही.सदर प्रकरणी मा.सहाय्यक आयुक्त,अन्न व औषधी प्रशासन म. राज्य,अकोला यांना भ्रमणध्वनी वर माहीती कळविले सदर प्रकरणी फिर्याद दाखल करण्याबाबत आदेश मिळाल्याने फिर्यादी नामे निलेश रामदास ताथोड वय ४१ वर्षे अन्न सुरक्षा अधिकारी अकोला यांचे फिर्याद वरून आरोपी नामे श्री, राजेन्द्र रामराव महुरकर वय ६१ वर्षे रा. मोठे राम मंदीरा जवळ कारंजा लाड जि. वाशिम यांचे कृती हि. भा. द.वि. कलम १७९ प्रमाणे होत असल्याने त्याचे विरूध्द सदरचा गुन्हा दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक आधारसिंग सोनोने पो.स्टे.कारंजा शहर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/प्रशांत जाधव हे करीत आहेत.

पोलीस निरीक्षक
पो. स्टे. कारंजा (शहर)
जि. वाशिम